MHST200023472020

## नि.दि.दावा क्र.२९०/२०२३ मधील निशाणी क्र.७२ वरील आदेश

प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुद्ध झालेला विना म्हणणे आदेश रद्द होवुन त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. दोन्ही पक्षांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदरचा दावा वादीने जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल करण्यात आला आहे. सदर प्रतिवादी यांनी नि.क्रं.५ वर म्हणणे दिले नसल्याने त्यांचेविरुद्ध दि.२१.१०.२०२१ रोजी 'म्हणणे नाही' आदेश पारीत करणेत आला. त्यामुळे न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

### आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांचेविरुद्ध झालेला विना

म्हणणे आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे स्विकारण्यात येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.07.08 13:18:18 +0530

स्थळ : वाई.

दिनांक : ०७/०७/२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.